**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४७ विषयाबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्रमांक -१५९ दिनांक – १४/०५/२०२५

विभाग – सार्व.बांधकाम विभाग

---

**प्रस्तावाचा विषय** – मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत अहिल्यानगर शहर भुयारी गटार योजना टप्पा -१ कार्यान्वित करण्यासाठी महानगरपालिकेस कर्ज उपलब्ध करून देणे बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्तावित केल्या नुसार,अहिल्यानगर शहरासाठी मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत अहिल्यानगर शहर भुयारी गटार योजना टप्पा -१ कार्यान्वित करण्यासाठी महानगरपालिकेस कर्ज उपलब्ध करून देणे बाबत.मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्रधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक चिशा/ १७४६२०१७ दि. १८/०९/२०१७ तांत्रिक मान्यता आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास ,शासन निर्णय क्र अमृत २०१७/प्र.क्र. ४२९ / नवि ३३ दिनांक २५/०९/२०१७ अन्वये रू १३१.०६ इतक्या रकमेची प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. योजनेचे कार्यारंभ आदेश मा. आयुक्त अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांचे मार्फत क्र. ५५५ दि. ३०/०६/२०१८ अन्वये मे. ड्रीम कन्स्ट्रक्शन ,नंदुरबार यांना देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र शासन निर्णय क्र अमृत २०२३ प्र. क्र. १२७ / नवि ३३ दि. ०६/०४/२०२३ अन्वये या योजनेस रू . ३२.२० कोटी वाढीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर योजनेसाठी १३१.०७ + ३२.४३ असे एकुण रूपये १६३.५० कोटी इतका निधी मंजुर आहे. सदर निधीची वर्गवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | उपलब्ध झालेला निधी (कोटी ) | मा. क्रेंद्रशासन हिस्सा (कोटी ) | मा. राज्यशासन हिस्सा (कोटी ) | स्थानिक स्वराज संस्था हिस्सा (कोटी ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुळ मंजुर योजना | १३१.०७ | ६५.५३ | ३२.७७ | ३२.७७ |
| २ | वाढीव निधी प्रशासकीय मान्यता | ३२.४३ | १६.२१५ | ८.१०७५ | ८.१०७५ |
| ३ | एकुण | १६३.५० | ८१.७४ | ४०.८७७५ | ४०.८७७५ |

अमृत भुयारी गटर योजना टप्पा -१ ही भौतिक दृष्या पुर्ण झालेली आहे. योजना कार्यान्वित करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेस निधीची आवश्यकता आहे. अमृत भुयारी गटर योजना टप्पा-१ करीता एकुण १६३.५० कोटी पैकी रू १३३.७९ कोटी इतका खर्च झालेला असून मनपा हिस्सा रू २१.४१ कोटी इतका खर्च झालेला आहे मनपा हिस्सापोटी उर्वरीत रक्कम रू १९.४६७५ कोटी इतकी रक्कम ठेकेदार संस्थेस देणे असून सद्यस्थितीत मनपाची आर्थिकस्थिती कमकुवत असून मनपाकडे निधी उपलब्ध नाही.

अमृत भुयारी गटर योजना टप्पा -१ पुर्ण झालेनंतर भुयारी गटर योजना टप्पा -२ मान्यतेसाठी मा. शासनाकडे सादर केलेली असून मा. शासन स्तरावर प्रलंबित आहे. भुयारी गटर योजना टप्पा -२ चे काम त्वरीत चालू करणेसाठी उपनगरातील नागरीकांनी अनेकवेळा आंदोलने केलेली असून आरोग्याच्या दृष्टीकोनातुन सदर योजना त्वरीत राबविणे अत्यावश्यक आहे.

अमृत भुयारी गटर योजना टप्पा -१ पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेसाठी मा. शासनाकडे रू . १५ कोटी कर्ज उपलब्ध करून देणेसाठी मा. शासनाकडे मागणी करणे बाबतच्या प्रस्तावास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( सपना वसावा )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका